आर.सी.सी.क्र.०८/२०१७
सरकार वि. आजिनाथ वगैरे
निशाणी क्र.९२

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.४ चा शपथेवर जबाब :-**

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

**माझे नाव** : सुदाम गिन्यानदेव खेडकर
**माझे वय** : ४७ वर्षे
**व्यवसाय** : शेती
**राहणार** : मुंगुसवाडे, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.

**सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीमती. ए. बी. कुलकर्णी यांचे मार्फत :-**

दिनांक २७.१०.२०१६ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. माझे समक्ष पोलिसांनी कोणताही पंचनामा केला नाही. परंतु माझी सही घेतली होती. आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनाम्यावरील अ.क्र. १ ची सही माझी आहे परंतु, त्यातील मजकूर मला माहित नाही. **घटनास्थळ पंचनाम्यावरील अ.क्र. १ च्या सहीस निशाणी ९३ देण्यात येते.**

**(साक्षीदार सरकार पक्षास सहयोग करत नाही. करीता सरकारी वकीलांनी उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजूर.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २७.१०.२०१६ रोजी सकाळी ९.०० ते ९.४५ चे दरम्यान पोलीसांनी मला मुंगुसवाडे ते एकनाथवाडी जाणारे रोडवर घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलाविले होते व घटनास्थळ हे फिर्यादी सुलाबाई यांनी दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, त्याप्रमाणे पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याने मी त्यावर सही नि क्र. ९३ केली होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यावरील सही नि क्र. ९३ ही मी त्यातील मजकूर वाचून तो बरोबर असल्याने केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझ्या शेजारी असल्याने मी त्यांना वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे ॲड. श्री. आर. एन. खेडकर यांनी नाकारला:-**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2025.09.20 17:05:45 +0530

**(रविकिरण सपाटे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
**(न्यायालय क्र.१) , पाथर्डी.**

दिनांक: २०/०९/२०२५
**ठिकाण : पाथर्डी**